# शिरपूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**प्रा. ईश्वर सिताराम बोरसे**
सहाय्यक प्राध्यापक
आर.सी.पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शिरपुर जि.धुळे

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. प्रस्तुत संशोधनात १२० शिक्षकाची नमुना म्हणून निवड केली. त्यात ६० प्राथमिक शाळेतील शिक्षक व ६० माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा समावेश आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांची अध्यापक परिणामकारकता मापन करण्यासाठी संशोधकाने स्वनिर्मित अध्यापक परिणामकारकता मापिकेचा अवलंब केला होता. संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब करण्यात आला होता.

**निष्कर्ष:** प्राथमिक शाळेतील शिक्षकांपेक्षा माध्यमिक शाळेतील शिक्षकांची अध्यापक परिणाम कारकता अधिक दिसून येते. तर प्राथमिक व माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांची अध्यापक परिणामकारकता पुरूष शिक्षकांपेक्षा अधिक दिसून येते.

**Keywords-**

अध्यापक परिणामकारकता, प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक

**प्रस्तावना :**

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा वयोगट १२—१४ असतो. या गटातील विद्यार्थी अनुकरणातुन शिकत असतात. या वयोगटावर शिक्षकांच्या प्रभाव मोठ्या प्रमाणावर पडत असतो. हा वयोगट शिक्षकांच्या प्रत्येक कृती चे अनुकरण करुन बघतो. तसेच या वयोगटात विद्यार्थ्यांचा मानसिक भावनिक, सामाजिक, शारीरिक विकास जलद गतीने होतो. म्हणून या वयोगटाला अनुसरुन शिक्षकांचे अध्यापन असे असावे की, त्यांचा चांगला परिणाम विद्यार्थ्यांवर पडावा विद्यार्थ्यांचे प्रत्येक मनोरचनेचे निदान करता यावे. यासाठी शिक्षकांचे अध्यापन प्राचीन परंपरागत पद्धतीने असू नये. तर आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांचा भावनिक विकास, सामाजिक जाणीवांचा विकास इत्यादी दृष्टीकोनातून अध्यापन असावे. या करीता शिक्षकांचे अध्यापन परिणामकारक असावे.

महात्मा गांधीनीसुद्धा शिक्षणावर भर दिला आहे. त्यांच्या मते केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे शिक्षणाचा प्रारंभ देखील नव्हे शिक्षण महणजे बालकाच्या व व्यक्तिच्या सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करुन व्यक्तिचा शारिरीक व मानसिक अध्यात्मिक विकास साधनारे साधन होय. या सर्व बाबी तेव्हाच साध्य होऊ शकतात जेव्हा शिक्षिक आपल्या कर्तव्यांवर खरा उतरेल म्हणजे त्यांच्या अध्यापन परिणमकारक तेव्हाच जाणवेल.

आजच्या शिक्षण पद्धती हि गतिमान झालेली आहे. आज जागतिकीकरण व उदारीकरणामुळे अध्ययन अध्यापनाच्या साधनात तंत्रात प्रचंड बदल झालेला आहे. या बदलत्या परिस्थितीमध्ये भारतीय संस्कृतीचा मुल्यांची जोपासन करणे, याची वृद्धी करणे हे सर्वात मोठे आव्हान शिक्षकांसमोर उभे आहे ही आव्हाने पेलण्यासाठी शिक्षकांचे अध्यापन परिणामकारक घडावे यासाठी शिक्षकांची

मानसिकता शैली, दृष्टीकोन बदलला पाहिजे म्हणुन प्रस्तुत संशोधनात संशोधन माध्यमिक शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा अभ्यास केला आहे. प्रामुख्याने शिक्षक फक्त विद्यार्थी घडवित नसुन प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे समाज घडवित असतात. परिणामी समाज परिवर्तनाची जबाबदारी शिक्षकांवर असते. उदा. कोठारी आयोगाने सांगितल्याप्रमाणे भारताचे भविष्य वर्गा वर्गातुन घडत आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भावना समजुन घ्याव्यात व त्यानुसार आपले अध्यापन कार्य करावे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारी शिक्षकांवर येते कुटंबापासुन विद्यार्थी शाळेत आल्यावर त्यांची विकासाची जबाबदारी शिक्षकांवर येते तसेच तो शाळेत शिक्षकांच्या अधिपत्याखाली जास्त वेळ वावरतो म्हणजे त्यांच्यावर विद्यार्थ्यांच्या विकासाची जबाबदारी येते. म्हणुनच शिक्षकांचे अध्यापन परिणाकारक असावे असे वाटते. आज मानवाच्या ज्ञानात नवनवीन संकल्पनाची भर पडत आहे. त्या संकल्पनाचे ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावे व त्यातुनच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साधता येईल यासाठी शिक्षकांचे अध्यापन परिणामकारक असणे गरजेचे होते.

**समस्या विधान:**

शिरपूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

उद्दिष्ट: शिरपूर तालुक्यातील प्राथमिक माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना:**

१. शिरपूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
२. शिरपूर तालुक्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
३. शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**संशोधन पद्धती:**

थोडक्यात प्रस्तुत संशोधनात संशोधकाने वर्णनात्मक पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केला आहे. जनसंख्या व न्यादर्श:शिरपूर तालुक्यातील एकूण प्राथमिक व माध्यमिक शाळेतील ७५० शिक्षक व शिक्षिका ही या संशोधनाची जनसंख्या निश्चित ठरविण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने एकूण जनसंख्येतील (७५०) शिक्षकामधून १६: म्हणजे १२० शिक्षकाची नमुना म्हणून निवड केली. त्यात ६० प्राथमिक शाळेतील शिक्षक व ६० माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा समावेश आहे. संशोधनाचे साधने: प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांची अध्यापक परिणामकारकता मापन करण्यासाठी संशोधकाने स्वनिर्मित अध्यापक परिणामकारकता मापिकेचा अवलंब केला होता. यात एकूण १५ विधाने होती. सहमत, असहमत आणि सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते. सदर मापिका ही तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून तपासून घेण्यात आली होती. संख्याशास्त्रीय परिमाणे: प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब करण्यात आला होता.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ:**

प्रस्तुत संशोधनात अध्यापक परिणामकारकता मापिकेला प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण करुन पुढीलप्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आले होते.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

**परिकल्पना परीक्षण**

**परिकल्पना क्रं. ०१: शिरपूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

| अध्यापक परिणामकारकता | शिक्षक संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक शिक्षक | ६० | २२.४५ | १.१७ | २.०० | २.६६ | त्याग |
| माध्यमिक शिक्षक | ६० | २१.६९ | १.८७ | | | |

**निरीक्षण व अर्थनिर्वचन:**

df = ११८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य २.६६ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, शिरपूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो. प्राथमिक शाळेतील शिक्षकांपेक्षा माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे अध्यापक परिणामकारकतेचे मध्यमान अधिक आहे. यावरुन असे दिसुन येते की, माध्यमिक शाळेतील शिक्षकांची अध्यापन परिणामकारकता प्राथमिक शाळेतील शिक्षकांपेक्षा अधिक दिसून येते.

**परिकल्पना क्रं. ०२: शिरपूर तालुक्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिका यांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

| प्राथमिक शाळा | शिक्षक संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षक | ३० | १८.६९ | १.२४ | २.०० | २.६० | त्याग |
| शिक्षिका | ३० | १९.५४ | १.८८ | | | |

**निरीक्षण व अर्थनिर्वचन:**

df = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 'ज'मूल्य २.६० असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, शिरपूर तालुक्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिका यांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो. प्राथमिक शाळेतील शिक्षिकांचे अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांक शिक्षकांपेक्षा अधिक आहे. यावरुन असे दिसुन येते की, प्राथमिक शाळेतील शिक्षिकांची अध्यापन परिणामकारकता शिक्षकांपेक्षा अधिक आहे.

**परिकल्पना क्रं. ०३: शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिका यांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

| माध्यमिक शाळा | शिक्षक संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षक | ३० | १९.८० | १.११ | २.०० | ४.३९ | त्याग |
| शिक्षिका | ३० | २१.५५ | १.३४ | | | |

**निरीक्षण व अर्थनिर्वचन:**

df = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य ४.३९ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिका यांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो. माध्यमिक शाळेतील शिक्षिकांचा अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांक शिक्षकांपेक्षा अधिक आहे. यावरुन असे दिसुन येते की, माध्यमिक शाळेतील शिक्षिकांची अध्यापन परिणामकारकता शिक्षकांपेक्षा अधिक आहे.

**निष्कर्ष**

१.शिरपूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो.

२.शिरपूर तालुक्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो.

३.शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो.

**संदर्भसूची:**

१. कदम चा. प. (१९८९), शैक्षणिक संख्याशास्त्र, नुतन प्रकाशन, पुणे.
२. मस्के टी.ए. (२००७), शैक्षणिक संख्या, इन्साईट पब्लीकेशन, नाशिक.
३. भांडारकर के.म. (२००४), सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, नित्यनुतन प्रकाशन, पुणे.
४. नानकर प्र.ल., सुबोध शैक्षणिक मानसशास्त्र, नुतन प्रकाशन, पुणे—३०.
५. सोहोनी श.कृ., शैक्षणिक टिपा कोष, सोहोनी प्रकाशन, पुणे.
६. भिंताडे, वि. रा. (१९८९). शैक्षणिक संशोधन पध्दती य प्रथम आवृत्ती : नूतन प्रकाशन, पुणे. Best J-W- and Khan J-V- (1987), Research in Education